# भारतीय राज्यघटनेतील समता मुल्यांची सामाजिक वास्तविकता

**सिध्दार्थ अभिमान गवळी**
संशोधक
राज्यशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

**प्रा.डॉ.पुरूषोत्तम वायाळ**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय,
परतुर जि.जालना.

**प्रस्तावना :**

आज संपुर्ण विश्वामध्ये अशांतता, हिंसाचार, आत्याचार, अराजकता माजली आहे. सगळी मानवजात धोक्यात आली आहे की काय ? असे वाटू लागले आहे. याचे कारण समतेचा अभाव हेच आहे. 'स्वातंत्र्य, समता,आणि बंधूता हे लोकशाहीचे अविभाज्य घटक आहे. ज्या आर्थी मानव जातीतील सर्व व्यक्तिंची स्वभाविक प्रतिष्ठा व त्यांचे सामन व अहस्तांरणीय अधिकार यांना मान्यता देणे, हा जगातील स्वातंत्र्य, न्याय व शांतता यांच्या प्रस्थापनेचा पाया होय. मानवी अधिकारांची अवहेलना व अप्रतिष्ठा झाल्याने अमानूष्य कृत्ये घडून आली आणि त्यायोगे मानवजातीच्या सदसदविवेक बूध्दीवर भंयकर आघात झाला आहे. हॉब्स असे म्हणतो की, 'स्वातंत्र्यांची कल्पना भिताशी सुसंगत आहे. द्वितीय विश्वयुध्दामध्ये शेकडो– हजारो प्राणहाणी झाल्यामुळे संयूक्त राष्ट्र संघाने मानव अदिकाराला खूप आवश्यक मानले. अशी घटना भविष्यामध्ये होऊ नये म्हणून १९४८ साली आमसभेमध्ये मानव अधिकारांच्या सर्वभौम घोषणेला स्वीकृती दिली.

संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने १० डिसेंबर १९४८ साली पॅरिस येथे स्विकारलेले आहे. म्हणून १० डिसेंबर हा जागतिक मानव अधिकार दिन म्हणून साजरा करतात. मानव अधिकार हे घोषणापत्र दुसऱ्या महायुध्दाने जगाने अनुभवलेल्या नृशंस अत्याचारांचा परिणाम म्हणून अस्तित्वात आले. सर्व मानवांच्या जन्मसिध्द अधिकारांची पहिली जागतिक अभिव्यक्ती म्हणून या मानवघोषणापत्राकडे पाहण्यात येते यात एकूण ३० कलमे असून त्यांच्या सविस्तर अर्थ नंतर झालेल्या अनेक जागतिक करारांमधून, राष्ट्रीय घटना आणि कायदे यातून तसेच स्थानिक मानव अधिकार संघटनांकडून लावण्यात आला आहे. 'मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विध्येयक' १९६० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मांडण्यात आले. १९७६ साली पुरेशा सदस्य राष्ट्रांच्या पाठिंब्यानंतर त्यास आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

*** संशोधनाची उदिद्ष्टे :**

१) भारतीय समाजातील असमानता अभ्यासणे.

२) भारतीय राज्यघटनेने बहाल केलेला समतेचा अधिकार व त्यामुळे झालेले परिवर्तन अभ्यासणे.

३) लोकशाही बळकट करण्यासाठी मुलभूत अधीकारांची भूमिका तपासणे.

४) व्यक्तीविकासासाठी मानव अधिकारांची भूमिका तपासणे.

५) विकसित राष्ट्र घडवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनावादी विचारांना अभ्यासणे.

*** समता म्हणजे काय ? समतेचा अर्थ :**

समतेच्या अर्थ सम म्हणजे सारखे असा होतो, परतू समतेचा अर्थ खूप गहन आहे. सर्वांना सारखी वाटणी करावी म्हणजे समानता व उपेशित घटकांना त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी जास्तीची तरतूद करणे म्हणजे समता होय समानता म्हणजे कोणत्याही विशिष्ट गटास विशेषअधिकार नसणे प्रस्ताविकेत सर्व भारतीय नागरिकांना दर्जा व संधीची समानता देण्यात आली आहे. त्यामध्ये नागरी, राजकीय व आर्थीक अशा तिन्ही समानतेचा समावेश होतो. प्राचीन भारतात व ऋषी मूनींच्या विचारातही 'वसूर्धेव कुंटुबकम' हे मुलभुत सुत्र दिसून येते तरी पण चर्तुवर्ण व्यवस्था आर्यांनी भारतात रूजवल्यामुळे पुढे आंतर वर्ण विवाह होऊन नवीन जात निर्माण होत गेली. व कालांतरांनी कामावरून जात व जातीवरून काम अशी वाईट व्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे विशिष्ट जातीत जन्मलेला मनूष्य श्रेष्ठ व इतर कनिष्ठ अशी अत्यंत अन्याकारक प्रथा आपल्या देशात निर्माण झाली.

भारतीय समाज सुरूवातीस चर्तुवर्ण व्यवस्थेत म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असा विभागला गेला नंतर सहा हजार जातीमध्ये खंडीत झाला. याचा फायदा विदेशी आक्रमणांनी घेतला, ग्रीक सम्राट ॲलेक्झांडर पासुन ते ब्रिटीशांपर्यांत सर्वांनी भारतावर आक्रमण करून भारताला गुलाम केले. म्हणूनच डॉ.बाबसाहेब आंबेडकर म्हणतात की, सर्वांना शस्त्र हाती घेण्याची संधी असती तर हा देश केव्हांच गुलाम झाला नसता. प्रत्येक देशाचे संविधान त्या त्या देशातला माणूस इतिहास संस्कृती व परिस्थीतीनुसार घडविले जाते. याला भारतीय संविधानही अपवाद नाही. भारतात जे भौगोलिक, ऐतिहासिक सांस्कृतीक, सामाजिक बदल होत गेले त्यासर्वाचे प्रतिबिंब भारतीय राज्य घटनेत पडलेले आपल्याला आढळून येते. भारतीय समाजामध्ये अत्यंत असमानता होती म्हणूनच भारतीय राज्य घटनेत 'समतेचा अधिकार' मुलभूत अधिकार अमेरिकेच्या संविधानापासून प्रेरीत आहेत. संविधान संभेने घटना निर्मतीची कामे पूर्ण करण्यासांठी विविध समित्यांची निर्मिती केली. त्यांपैकी आठ प्रमुख समित्या होत्या. त्यामध्ये मुलभूत हक्क व अल्पसंख्यांक विषय समितीचे अध्यक्ष सरदार वल्लभाई पटेल होते. या समितीच्या दोन उप-समित्या होत्या.

१) मुलभूत उप-समिती-जी.बी.कृपलानी.

२) अल्पसंख्यांक उप–समिती–एच.सी.मुखर्जी हे प्रमुख होते.

जॉन लॉक असे म्हणतो की, “कायदे मंडळ कार्यकारणी मंडळाहून श्रेष्ठ आहे. तरी कायदे मंडळाचे कार्यकारणी वर वर्चस्व असावे.” भारतीय राज्य घटनेत अभिव्यक्ती स्वंतत्र या अधिकाराचा समावेश केलेला आहे. ❋

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

भारतीय राज्य घटनेतील समता मुल्यांची सामाजिक वस्तविकता : विशेष संदर्भ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर. प्रस्तुत विषयाचे म्हत्तव सर्वकालीन आहे. तसेच भारतीयांमध्ये समतेचे विचार रूजविण्यासाठी त्याचे महत्व सर्व कालीन आहे. आपण सर्व जानतोच की, भारत देश बहुधर्मिय, बहुभाषीय, विविध रूढी परंपरा वेशभुषा विभिन्न आहे. त्याच बरोबर देशाची एकता व अंखडता आबाधीत राखण्यासाठी प्रस्तुत विषयाचे महत्व अनन्यसाधारण आहे. दु:खाने नमूद करावे वाटते की, काही राजकीय मंडळी भारतीयांमध्ये जात, धर्म,भाषा, प्रदेश, प्रांतवाद, इत्यादी बाबींवरून सतत तणाव निर्माण करून मतांच राजकारण करतात. त्यामुळे भारतीय राज्य घटना व त्याद्वारे मिळालेले मानव अधिकार, राजकीय,धार्मिक, आर्थिक, सामाजिक जिवन जगण्याचे स्वातंत्र्याचे अभिवचन अंत्यत महत्वाचे आहे. व या विषयांवर जितकी जागृती होईल तितकी कमी आहे. कारण जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र असणारा देश जगाच्या पाठिवर एकमेव आहे. त्यामुळे प्रस्तुत विषय अत्यंत महत्वाचा आहे.

**❋ संदर्भ (ग्रंथसूची) :**

१) भारताचे संविधान – डॉ. शूभांगी राठी अथर्व पब्लिकेशन

२) भारतीय शासन आणि राजनीती – प्रा. शेख दशरथ आणि डॉ.जोगेंद्र गवई, विश्व पब्लिकेशन ऑन्ड डिस्ट्रीब्युटर्स नागपूर.)

३) भारतीय शासन व राजकारण – डॉ. सुधाकर जोशी,विद्या बूक पब्लिटार्स औरंगपूरा औरंगाबाद.

४) जाति व्यवस्थेचे निर्मूलन – डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधणे प्रकाशन, महाराष्ट्र शासन.